# सोलापूर शहर पोलीस

## चालक पोलीस शिपाई भरती - 2022/23

चालक पोलीस शिपाई भरती, 2022-23 साठी उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार, दिनांक 14/07/2024 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 वा. दरम्यान **SVCS HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE (श्री वीरतपस्वी चन्नावीर शिवाचार्य हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज), एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर** या ठिकाणी घेण्यात आली आहे.

सदर लेखी परीक्षेनंतर या कार्यालयाकडून उत्तरपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर उत्तरपत्रिकेच्या अनुषंगाने उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या आक्षेपांची सखोल पडताळणी केल्यानंतर खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात आली आहे.

### आक्षेप क्रमांक - 1

**मुळ प्रश्न - (प्रश्नसंच A मधिल 91, B मधिल 71, C मधिल 51 व D मधिल 31)**

प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्राची विधग्राह्यता ........... ?

A) 6 महिने     B) 1 वर्ष
C) 2 वर्ष     D) 9 महिने

निर्णय: - सदर प्रश्नाच्या उत्तराबाबत BS-III पर्यंतच्या वाहनांसाठी 6 महिने व BS-IV व त्यापुढील वाहनांसाठी 1 वर्षासाठी PUCC देण्यात येत असल्याने यातील पर्याय क्रमांक A व B हे दोन्ही बरोबर असून, उमेदवाराने या दोन्ही पैकी कोणताही एक पर्याय निवडला असल्यास त्यास 1 गुण देण्यात येईल.

### आक्षेप क्रमांक - 2

**मुळ प्रश्न - (प्रश्नसंच A मधिल 57, B मधिल 97, C मधिल 47 व D मधिल 57)**

चाऱ्याची एक गासडी 9 वासरे व 7 गार्यींना पुरते. तर 9 गासड्या चारा 54 वासरे व किती गायींना पुरेल ?

A) 84     B) 102
C) 63     D) 81

निर्णय: - सदरच्या प्रश्नामध्ये देण्यात आलेली माहिती अपूर्ण असल्याने सदरचा प्रश्न रद्द करण्यात येत असेन, सदरच्या प्रश्नासाठी सर्वांना 1 गुण देण्यात येत आहे.

### आक्षेप क्रमांक - 3

**मुळ प्रश्न - (प्रश्नसंच A मधिल 80, B मधिल 70, C मधिल 30 व D मधिल 10)**

खालीलपैकी महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्याला दोन राज्यांच्या सीमा लागलेल्या नाहीत ?

A) नंदूरबार     B) धुळे
C) गोंदिया     D) गडचिरोली

निर्णय: - सदरच्या प्रश्नातील सर्व पर्याय चुकीचे असल्याने सदरच्या प्रश्नासाठी सर्व उमेदवारांना 1 गुण देण्यात येत आहे.

आक्षेप क्रमांक - 4

**मुळ प्रश्न** - (प्रश्नसंच A मधिल 07, B मधिल 37, C मधिल 87 व D मधिल 17)

बुद्धीबळ पटामध्ये एकूण किती चौकोन आहेत ?

A) 64 B) 128
C) 204 D) 164

निर्णय: - सदरच्या प्रश्नामध्ये किती चौरस आहेत असे विचारण्याऐवजी चौकोन हा शब्द वापरल्याने एकही पर्याय बरोबर नाही. त्यामुळे सदर प्रश्नासाठी सर्वांना 1 गुण देण्यात येत आहे.

**याव्यतिरीक्त आलेल्या आक्षेपांची सखोल तपासणी करून पाहिली असता, त्यामध्ये तथ्य निदर्शनास न आल्याने व उत्तरतालिकेमध्ये दिलेला पर्याय बरोबर असल्याने असे आक्षेप फेटाळण्यात आले आहेत.**

**(अजित बोऱ्हाडे)**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
सोलापूर शहर